**नियमित दिवाणी दावा क्र. १९१/२०१२**
**निशाणी ९६ सोबत**

**प्रतिवादी क्र. १ व २ यांचे विरुध्द दावा एकतर्फा चालु असल्याने त्यांचेमार्फत उलटतपास नाही.**

**प्रतिवादी क्र. ३ व ४ व तर्फे वकिल यांना पुकारले असता गैरहजर. सबब, त्यांचेमार्फत उलटतपास नाही.**

**वादीतर्फे सा. क्र. ४ चा उलटतपास प्रतिवादी क्र. ५ तर्फे वकील . व्ही. बी. सावंत यांचेमार्फत**

३. मी इलेक्ट्रीकल इंजिनिअर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सेवा निवृत्त झालेपासुन सांगली येथे वास्तव्यास आहे. मी सन २०११ मध्ये सेवानिवृत्त झालो आहे. मला सदर दाव्याबाबत थोडीशी माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्याच्या अनुषंगाने काय काय घडामोडी घडल्या याची मला संपूर्ण माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ व मी समवस्क असुन एकमेकांचे भावकीतील आहोत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ यांना पद्मिनी ही एक बहिण होती. हे म्हणणे खरे आहे की, पद्मिनीला दाव्यात पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. १ हा गावी हॉटेल व्यवसाय करीत होता. वादी क्र. २ मुंबईला ट्रान्सपोर्ट व्यवसाय करीत होते व प्रतिवादी क्र. ३ आटपाडी येथे राहत असुन कारखान्यात नोकरीस आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. १, २ व प्रतिवादी क्र. ३ हे वेगवेगळया ठिकाणी राहावयास आहेत. हे मला माहिती नाही की, त्यांचे रेशनकार्ड वेगवेगळे आहेत किंवा कसे. प्रतिवादी क्र. ३ यांचे पत्नीचे नांव शारदा असुन तिच्या नांवे ग्रा. पं. मिळकत नंबर ८८३ आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. वादी क्र. १ यांच्या पत्नीचे नांव सुनंदा असुन तिच्या नांवे ग्रामपंचायत मिळकत क्र. ८८४ आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. वादी क्र. २ यांच्या पत्नीचे नांव पुनम असुन तिच्या नांवे ग्रामपंचायत मिळकत क्र. ८८५ आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ हिचे नांवे गट क्र. २७० आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची मिळकत तुकाराम गायकवाड यांचेकडुन खरेदी घेतली होती. वर नमुद सर्व मिळकती या दाव्यात समाविष्ट आहेत किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ याचे नांवे गट क्र. २८८ ही मिळकत होती. सदरची मिळकत प्रतिवादी क्र. १ याने गुलाब सुखदेव गायकवाड यांना विक्री केली किंवा कसे याविषयी मला माहिती नाही. तसेच प्रतिवादी क्र. १ यांचे नांवे गट क्र. ४९२ होती व ती त्यांनी फुलाबाई गायकवाड यांना विक्री केली किंवा कसे याविषयी मला माहिती नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझे सरतपासचे प्रतिज्ञापत्रामध्ये माझे कोणती मिळकत दावा मिळकतीचे लगत आहे, हे नमुद केलेले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो सदर मिळकतीचा क्र. २६६ आहे. सदरचा मजकुर माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रात नमुद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे

आहे की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो तसे मला पाठांतर नाही. सरतपासातील मजकुर माझे सांगणेप्रमाणे तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलार्जित मिळकती आहे हे सांगण्याकरीता माझे तोंडी पुराव्याशिवाय इतर पुरावा नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो माझ्याकडे वादी व प्रतिवादी यांचे पुरावे ठेवणेचे कारण नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची समाईकात कब्जे वहिवाट आहे असे दर्शिविण्याकरीता माझेकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ५ चे खरेदीपत्रावेळी मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी पत्राचेवेळी प्रत्यक्ष काय घडामोडी घडल्या याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे खरेदीपत्र हे प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ५ यांना करुन दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीदस्तानुसार गट क्र. ५०३ मधील संपूर्ण हिस्सा, गट क्र. ५०६ मधील संपूर्ण हिस्सा, गट क्र. ४९३ मधील विहीर व पाण्यामध्ये १ आणेचा हिस्सा विक्री केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या खरेदी दस्तानुसार चतुःसिमापूर्वक क्षेत्र विक्री केलेले आहे. सदर खरेदी पत्राचा मोबदला रक्कम रु. एक लाख पाच हजार, प्रतिवादी क्र. ५ यांनी प्रतिवादी क्र. १ यांना दिलेला आहे किंवा कसे याबद्दल मला माहित नाही. मला लिहीता वाचता येते. आता साक्षीदारास निशाणी क्र. ६४ वरील दस्त दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्तामध्ये असे नमुद केलेले आहे की, दस्त झालेल्या दिवशी मिळकतीचा कब्जा प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ५ यांना दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दस्त अदयाप कोणत्याही न्यायालयाने रद्द केलेला नाही. सदरच्या खरेदी दस्ताविरुध्द महसुल न्यायालयात काही तक्रारी प्रलंबित आहेत किंवा नाही याविषयी मला माहिती नाही. दावा मिळकतीचा सदयाचा चालु सातबारा उतारा मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी दावा मिळकतीचे सातबारा उताऱ्याची काहीही माहिती न घेता मी साक्षीस आलो आहे. ज्यावेळी खरेदी दस्त झाला त्यावेळेपासुन प्रतिवादी क्र. ५ चे नांव दावा मिळकतीस आहे किंवा कसे याविषयी मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी खरेदीपत्र झाले त्यावेळेपासुन दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादी क्र. ५ यांचेकडे आहेत. हे म्हणणे खरे नाही कि दावा मिळकत प्रतिवादी क्र. ५ यांचे कब्जात आलेपासुन त्यांनी ती विकसित केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ५ यांनी सदरची मिळकत सपाटीकरण करुन बागायत केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ५ हा त्या जमीनीमधुन उत्पन्न घेत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ५ यांनी प्रतिवादी क्र. १ यांचेकडुन करुन घेतलेले खरेदीपत्र नोंदणीकृत आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, मी इंजिनिअर म्हणुन पुणे, यवत येथे नोकरीस होतो. हे म्हणणे खरे आहे की, यवत उपविभागामध्ये मला निलंबित केले होते. यवत येथे वीज चोरीच्या प्रकरण मी तक्रार केली असल्यामुळे त्याविषयीचा राग मनात ठेवुन मला निलंबित केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याची कारवाई

सोलापुर येथे चालु होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर कारवाईमध्ये माझी प्रमोशन रद्द केले होते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो सदर निर्णयाविरुध्द केलेल्या अपिलामध्ये सदरचा निर्णय रद्द बादल झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, सोलापुरच्या कारवाईवेळी मी उपस्थित राहिलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, विश्वास हा माझा भाऊ आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २२/०३/२०१२ रोजी मी विश्वास याला भोकसले अशी माझ्या विरुध्द केस झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर केसमध्ये अंतिम युक्तीवाद मी स्वतः केलेला होता. साक्षीदार स्वताहून सांगतो की, सदर केसमध्ये माझी निर्दोष मुक्तता झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माइया पत्तीने माइया वडिलांना काठीने मारहाण करुन तासगांव स्टँडवर आणुन सोडले होते. हे म्हणणे खरे नाही की, माइया जावाईने माइया विरुध्द मुंबई येथे न्यायालयात केस दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे जावई वकील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ विश्वास यांनी केलेल्या केसमध्ये प्रतिवादी क्र. १ हा माझा जामीनदार होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे नामदेव याच्या बाजुने आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वीस वर्षापासुन सांगली येथे राहत असुन माझा भाऊ गावी मला जमीनमध्ये येवु देत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला गावाकडील काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या वडिलार्जित मिळकती आहेत किंवा कसे याविषयी मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळक्तीमध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा कब्जा आहे हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे खरेदीपत्र खोटे व फसवणुकीचे आहे हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये खरेदीपत्रापासुन प्रतिवादी क्र. ५ चा कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांना मदत करण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण
फेरतपास नाही.

समक्ष, श्रवणोत्तर निवदेन

स्विकृत

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2026.07.08 16:41:01 +0530

आटपाडी
दिनांक ०८/०७/२०२६

(अ. जो. बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश क स्तर आटपाडी.